# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/२०२५ दि. १७ फेब्रुवारी, २०२५

जळगाव दि. १७ ( प्रतिनिधी) :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त बुधवार दि. १९ फेब्रुवारी रोजी सांस्कृतिक कार्यक्रम व व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात सकाळी ११ वाजता गडकिल्ल्याचे अभ्यासक प्रा. देवदत्त गोखले यांचे व्याख्यान होणार आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. व्ही.एल.माहेश्वरी राहतील. प्रमुख अतिथी म्हणून पी.ई.तात्या पाटील उपस्थित राहणार आहेत. तसेच यावेळी सांस्कृतिक कार्यक्रम देखील होणार आहेत. त्याआधी सकाळी ७ वाजता विद्यापीठाच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या वतीने शिवप्रतिमेची मिरवणुक विद्यापीठाच्या हायवे गेट जवळील मुख्य प्रवेशद्वारापासुन निघणार आहे. ज्ञानस्त्रोत केंद्रातील अभ्यासिकेत कुलगुरू प्रा. व्ही.एल.माहेश्वरी यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला जाईल अशी माहिती कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी दिली.

बातमी क्र. २

जळगाव दि. १७ ( प्रतिनिधी) :- चंद्रपुर येथे गडचिरोली येथील गोंडवना विद्यापीठाच्यावतीने सुरू झालेल्या क्रिडा महोत्सव स्पर्धेत सहभागी होण्यासाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा संघ रविवारी रवाना झाला.

या स्पर्धेसाठी १५२ खेळाडू सहभागी असून त्यामध्ये ७६ विद्यार्थी व विद्यार्थिनींचा समावेश आहे. कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांनी संघाला शुभेच्छा दिल्या. यावेळी प्र.कुलगुरू प्रा.एस.टी.इंगळे, क्रिडा संचालक डॉ. दिनेश पाटील उपस्थित होते. संघासोबत डॉ.देवदत्त पाटील, डॉ.व्ही.के.पाटील, डॉ.शैलेश पाटील, डॉ. क्रांती क्षीरसागर, प्रा.विजय शिंदे, अमर हटकर, प्रा.बालाजी सलगर हे प्रशिक्षक म्हणून रवाना झाले आहेत.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनंसपर्क अधिकारी